# राशिभविष्य - सप्टेंबर, २०१४.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

========================================

**(१) मेष-** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. पण महिन्याच्या पूर्वार्धापेक्षा महिन्याचा उत्तरार्ध बारा जाईल, असे वाटते. विविध कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता जाणवते. त्यामुळेच शारीरिक अनारोग्य होणे शक्य आहे. या राशीच्या युवकांनी कुमार्गी सहकाऱ्यांपासून दूर राहावे. आर्थिक समस्या त्रस्त करतील. मुलांपैकी कोणाचे आजार, कोणाची अन्य समस्या, प्रिय जनांपासून होणारे दूरत्व, नातेवाईक मंडळीकडून होणारा त्रासयांमुळे त्रस्त व्हाल. पण गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरदार मंडळीना व ज्यांचा परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना अर्थलाभ व अन्य प्रकारचे लाभ होणे संभवते. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात थोडा मनस्ताप होण्याची शक्यताही जाणवते. शनी-मंगळ हे दोन्ही विरोधी ग्रह प्रतिकुल असल्याने स्वत:च्या व जीवनसाथीच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करील. कोणाला उष्णता विकाराचा त्रास तर कोणाला शारीरिक-मानसिक कष्ट सहन करावे लागतील. म्हणून मनावर ताबा ठेवून व सहनशील बनून प्रतिकुल काळाशी मुकाबला कराल तरच फारसा मनस्ताप सहन करावा लागणार नाही. सर्व प्रकारचे अपघात भय असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना करा.

**(२) वृषभ-** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात अनुकुल/प्रतिकुल असे संमिश्र प्रकारचे अनुभव देणाऱ्या घटना घडत

असल्याचा अनुभव येईल. गुरू-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने मनोनुकुल घटना घडतील; तर रवि-मंगळ हे दाहक ग्रह अनारोग्यकारक व वैवाहिक जीवनात मनस्ताप देणाऱ्या घटना घडवतील, असे वाटते. या राशीच्या काही लोकांना प्रवासाचे योग येतील; तर काहींना बांधवांकडून अकारण मनस्ताप दिला जाण्याची शक्यता जाणवते. या राशीच्या लेखक मंडळीचे लेखन पुस्तकरूपाने प्रकाशित होणे संभवते. तसेच काहीना अनपेक्षित अर्थलाभ होण्याची शक्यताही जाणवते. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याच्या उत्तरार्धात नोकरीत त्रास सहन करावा लागेल. त्यामुळे अनारोग्य होणेही संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात कौटुंबिक त्रासव वैवाहिक जीवनातही मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. पण मानसिक रोग तज्न्य व द्रव पदार्थाचे व्यापारी यांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. तसेच ज्यांचा शेती व्यवसाय आहे त्यांना काळ अनुुुकुल व लाभदायक होईल. ज्यांचाभागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी काहीही कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. काहीना प्रिय जनांपासून दुरावानिर्माण झाल्यामुळे अस्वस्थ वाटेल. सतत सावधानतेने आचरण करा. छोटे मोठे अपघात होण्याची शक्यताही जाणवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना करा. मन:शांती मिळेल.

(३) **मिथुन** - या राशीच्या मंडळीना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या महिन्याचा पूर्वार्धचअनुकु ल असणार आहे. त्यामुळे जे काही साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातचसाधून घेण्याचा प्रयत्न करा. पण उच्च चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकूल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती व सात्विक सुखशांती मिळू शकेल. काही मंडळीना सूचक स्वप्ने पडतील; तर

काहीना परदेश प्रवासाची संधी मिळेल. गुरू-शुक्राच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या सर्वांनाच कमी-अधिक प्रमाणात विविध प्रकारे सन्मान, प्रतिष्ठा , भूमिलाभ, धनलाभ, शेतीवाडीपासून लाभ अशा प्रकारचे लाभ होतील. पण विविध कारणांनी अपेक्षित कौटुंबिक सुख व संततिसुख लाभणे कठीण दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात नियोजित कार्यात अडचणी, विलंब निर्माण होणे, सतत मनाविरुद्ध घटना घडणे अशापैकी कारणांनी आशय मनस्‌ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. त्यामुळे नैराश्य येणे व शारीरिक अनारोग्य होणेही संभवते. काही मंडळीना ताप येणे, इजा होणे, रक्तविकार, हृदयविकार बळावणे अशापैकी आजारांना तोंड द्‌यावे लागेलसे दिसते. जपा. शिवाय चोरी होणे, फसवणूक होणे अशापैकी कारणांनी अर्थ हानी होण्याचीही शक्यता जाणवते. जपा.

**(४) कर्क** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्ध कौटुंबिक सुखाचे दृष्टीने तापदायक असल्याचा अनुभव येईल. आप्तेष्टामध्ये ्राहती जागा किंवा स्थावर संबंधी वाद, भांडणे होणे संभवते. जपा. तसेच काही मंडळीना आर्थिक चिंता त्रस्त करतील तर काहीना आर्थिक हानीमुळे, फसवले गेल्यामुळे मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. या राशीच्या काही मंडळीना संततीचे आजार वा अन्य समस्या त्रस्त करतील. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. पण गुरू-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे परिस्‌थिती आटोक्यात राहील. गुरू-हर्षल शुभ योगामुळे शास्त्रीय व गूढ संशोधन कार्यात कार्यरत असणारांना संपूर्णमहिन्याचा काळ अनुकूल, प्रगत िकारक व लाभदायक होईल. दांपत्यजीवनात सुखसमाधान लाभेल. काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे तर काहीना परदेश प्रवासाचे योग येतील. महिन्य ाच्या उत्तरार्धात शासकीय,

निम शासकीय नोकरदार मंडळीना काळ अनुकुल होईल व कर्तृत्ववान मंडळीना बढती, मानाचे स्थान असे काही मिळण्याची शक्यता दिसते. या राशीच्या साहित्यिकांचे साहित्य ग्रंथरूपाने प्रसिद्ध होणे संभवते. पण राहूमुळे काहीही कारणाने बंधुसुखात बाधा येणे संभवते. जपा. पाण्याशी संबंधित नोकरी-व्यवसाय असणारांनी सतत सावधानतेने आचरण करावे. जल भय, विष भय आहे. जपा. बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात मनावर ताबा ठेवून, सहनशील बनून सामोपचाराने आचरण करणेच हिताचे होईल. तसेच आध्यात्मिक उपासनेचा अवलंब करून उपास्य देवतेवर श्रद्धा ठेवून आचरण केलेत तरच सहन करावा लागणारा मनस्ताप सुसह्य होईल व फारसे अनारोग्यही होणार नाही. शक्यतो प्रवास टाळा. सतत सावधानतेने आचरण करा. कारण अपघात भय संभवते. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी तर अति विचार करू नये व काल्पनिक चिंता करून स्वत:लाच त्रास करून घेऊ नये. काही मंडळीना त्वचारोग, तर काहींना मुखदंत रोगाचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. गैरसमजाने किंवा अन्य कारणांनी कौटुंबिक वातावरण गढूळ होण्याची शक्यता आहे. जपा. पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे थोडा दिलासा मिळेल. दाम्पत्यजीवनातही अपेक्षित सुखसमाधान लाभेलच अशी शक्यता दिसत नाही. उच्च राशीतील शनीमुळे या राशीच्या युवकांना अपेक्षित अशी उत्तम नोकरी किंवा नवे आवडीचे कार्यक्षेत्र मिळण्याची शक्यता दिसते. वकिली, चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल.

**(६) कन्या -** शनि ग्रहाच्यासाडेसातीचा त्रास आता केवळ दोन महिने बाकी राहिला आहे. मनावर ताबा ठेवून, सहनशील बनून व नम्रतेने आचरण करून हा काळ व्यतीत केलात तर नंतर भावी काळातील मनोनुकुल घटनांचा आनंद उपभोगू शकाल. या महिन्याच्या काळात रवी-मंगळ- हर्षल हे तीन ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे घरीदारी सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. त्यामुळे शारीरिक-मानसिक अनारोग्य होणेही संभवते. जपा. रक्तविकार, हृदयविकार असणारांनी मन व बुद्धी शांत ठेवून आणि जिभेला लगाम घालून आचरण केल्यास होणारा मनस्ताप सुसह्य होईल. विचारपूर्वक आर्थिक व्यवहार करा. आर्थिक चिंता निर्माण होणे संभवते. जपा. तसेच कौटुंबिक जीवनात काहीही कारणाने वाद, भांडणे होणार नाहीत याची काळजी घ्या. मंगळ - गुरु शुभ योगामुळे यांत्रिक तांत्रिक नोकरी-व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय असणारांना, तसेच औषध विक्रेत्यांनातसेचबौद्धिक , शैक्षणिक नोकरदार मंडळीना काळ अनुकुल व लाभदायक होईल. इतरांना मनस्ताप सहन करूनच काळ व्यतीत करावा लागेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकूल होईल. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी संशय, गैरसमज यांमुळे भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. वरील कारणानीच वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येऊ शकेल. जपा.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच काही प्रमाणात अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या नोकरदार मंडळीना विविध प्रकारे मनोनुकुल घटना घडत असल्याचा अनुभव येईल. चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र , शिक्षणक्षेत्र , शास्त्रीय संशोधन क्षेत्अशापैकी कार्यक्षेत्र असणारांना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकूल

होणार असल्याने त्यांनी जे काय साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात विरोधी परिस्थितीशी मुकाबला करावा लागेल. सतत मनाविरुद्ध घडणाऱ्या घटना, आर्थिक समस्या, नियोजित कार्यात येणारे अडथळे, स्वत:चे किंवा जीवनसाथीचे अनारोग्य, कुटुंबात होणारे कोणाचे तरी स्थलांतर अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल. अशा परिस्थितीत मन शांत ठेवा, अति विचार करू नका, श्रद्धा असलेल्या दैवतावर सर्व भार सोपवा व सहनशील बनून विपरीत काळाला सामोरे जा. अध्यात्मात रस असेल तर या राशीच्या मंडळीना आध्यात्मिक उपासनेद्वारे मन:शांती मिळू शकेल. अति विचार व काल्पनिक चिंता कराल तर डोकेदुखीचा त्रास सहन करावा लागेल. काहींना मेंदु विकार होणेही संभवते. जपा. अशा परिस्थितीत गुरु-शुक्राच्या व काही प्रमाणात राहूच्या अनुकुलतेने मनोनुकुल घटना घडतील, कौटुंबिक सुखसमाधान लाभेल, काहीना परदेशगमनाची संधी मिळेल.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळीना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. थोरामोठ्यांच्या ओळखीतून इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. स्वतंत्र व्यावसायिकांच्या व्यवसायात प्रगती होईल. पण पहिले तीन आठवडे कलात्मक व्यवसाय असणारांना त्रासदायक होतील असे दिसते. महिन्याचा अखेरचा आठवडा मात्र अतिशय अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायकहोईल. मित्रमैत्रिणीच्या सहवासात सुखसमाधान लाभेल. गुरु-हर्षलच्या शुभ योगामुळे उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन व गूढ संशोधन कार्यक्षेत्रअसणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. पण शनि-मंगळ प्रतिकुल असल्यामुळे विविध कारणांनी मनस्ताप व अनारोग्य सहन करावे लागण्याची शक्यता दिसते. आपल्या तापट व संतापी स्वभावावर नियंत्रण ठेवा. अविचाराने व

हट्टाने वागून स्वत:ला मनस्ताप करून घेऊ नका. गुरु-हर्षल शुभ योग कालाविषकारालाही अनुकुल होईल. राहू-केतुमुळे य़ाआ राशीच्या विद्‍यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होणे संभवते. तसेच या राशीच्या मंडळीना अपेक्षित संततीसुख लाभण्याची शक्यता दिसत नाही. भाग्‍यस्थानी कर्क या उच्च राशीत असलेल्या गुरु ग्रहामुळे आध्यात्मिक उपासनेत प्रगती होईल. प्रवासाचे योग येतील व आवडीच्या कार्यक्षेत्रात नव्या संधी चालून येतील. श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळीना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या महिन्याचा उत्तरार्धचअनुकुल होईल. महिन्याच्या पूर्वार्धात घरीदारी वडील किंवा वरिष्ठ व्यकतीकडून विरोध होणे संभवते. कारण या प्‍रतिकुल काळात आपले कोणाशीच पटणार नाही, आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही, काल्पनिक चिंता त्रस्त करतील. मंगळामुळे अविचाराने खर्च होणे संभवते. तसेच काही जुनी दबलेली प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जाऊन त्यांचा असहय त्रास सहन करावा लागेल जपा. अशा परिस्थितीत केवळ शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग असेल त्यांना या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या उच्च राशीतील गुरूमुळे अचानक धनलाभ वा वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. महिन्याच्या उत्‍तरार्धात नोकरी-व्यवसायात अनुकूल परिस्थिती निर्माण होईल व मनोनुकुल घटना घडतील. इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. मोठ्या अधिकारी व्यक्तींच्याओळखीतून लाभदायक घटना घडतील. गूढविद्‍या, बौद्धिक , शैक्षणिक नोकरी-व्यवसाय, वकिली-सल्लागारी व्यवसाय, लोखंड, कोळसा विक्रेते अशांनामहिन्याचा उत्तरार्ध अधिकच अनुकुल व

लाभदायक होईल. काही मंडळीना जलप्रवासाचे तर काहीना परदेशगमनाचे योग येतील. श्रीगुरु दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. आर्थिक चिंता, अपेक्षित धन मिळविण्यासाठी करावे लागणारे कष्ट, मित्रांशी वितुष्ट येणे, विविध कारणांनी येणारी कौटुंबिक सुखातील बाधा, नोकरीत होणारा त्रास , असह्य मन्स्तापामुळे होणारे अनारोग्य, मानसिक ताण अशापैकी कारणांनी थकावट जाणवेल. म्हणून मन:शांतीसाठी आध्यात्मिक उपासनेत मन रमवावे, असे सांगावेसे वाटते. पण उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. तसेच वकिली, सल्लागारी व्यवसाय असणारांना, लोखंड कोळसा विक्रेत्यांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. तसेच या राशीच्या काही भाग्यवान मंडळीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही संभवते. शुक्राच्या अनुकुलतेने इतर काही मंडळीना भूमिलाभ, धनलाभ, नावलौकिक मिळण्याची शक्यताही दिसते. तसेच या राशीच्या सप्तम स्थानी उच्च राशीतअसलेल्या गुरु ग्रहामुळे या राशीच्या विवाहेच्छू युवक्युवतींचा विवाह ठरण्याची शक्यताही जाणवते. तसेच नवे प्रेमसंबंध वा स्नेहसंबंध जुळून येण्याची शक्यता दिसते. काहीना प्रवासाचे योग येतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकूल होईल. श्रद्धा असेल तर श्रीहनुमान उपासना व श्रीगुरुदेवदत्त उपासना अनुकूल होईल.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळीचे मन अत्यंत कोमल झाले असावे व मानसिक संवेदना अति शीघ्र होत असाव्यात असे वाटते. पण स्वभाव

मात्र अतिशय अस्थिर, चंचल व अविचारी झाला असावा, असे वाटते. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहरे नैराश्य येत असले पाहिजे. अशा परिस्थितीत या राशीच्या मंडळीनी मन व बुद्धीवर ताबा ठेवून आणि जिभेला लगाम घालून सहनशीलतेने आचरण केले तरच विपरीत काळ फारसा मनस्ताप न होता व्यतीत होऊ शकेल. अविचाराने खर्च होणार नाही याची काळजी घ्या. नपेक्षा आर्थिक चिंता करावी लागेल. या राशीच्या नोकरदार मंडळीना नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागेल. वरिष्ठांशी नमते घेऊन आचरण करणेच सुखाचे होईल. स्वतंत्र व्यावसायिकांच्या व्यवसायात विविध कारणांनी अडथळे निर्माण होण्याची शक्यता जाणवते. या राशीच्या युवकांना हातचे सोडून नवीन काही करण्याची उर्मी येईल. पण गुरु - मंगळाच्या शुभ योगामुळे केवळ वैद्‌यकीय व्यवसाय, औषध विक्रेतेयांना काळ अनुकुल होईल. मन व बुद्धी स्थिर राखू शकलात तर शारीरिक आरोग्यही फारसे बिघडणार नाही. पण जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. गुरु-शुक्रातील लाभ् योगामुळे या राशीच्या मंडळीना विविध प्रकारचे लाभ होणे संभवते. श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(१२) मीन -** सध्या या राशीच्या मंडळीचा स्वभाव चंचल, अस्थिर, लहरी झाला असण्याची शक्यता जाणवते. त्यामुळे कसलाही धाक, दडपण सहन होत नसावे, असे वाटते. शिवाय काही कारणाने नैराश्यही आले असावे. तसे असेल तर त्यांना सांगावेसे वाटते की स्वैर आचरण करू नका. मन व बुद्धीवर ताबा ठेवून आणि सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल. कारण नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने महिन्याचा पूर्वार्ध अतिशय अनुकुल आहे त्याचा लाभ घेता येईल. बौद्धिक , शैक्षणिक , शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व

लाभदायक होणार आहे. या राशीच्या नोकरदार मंडळीनाही महिन्याचा पूर्वा र्ध च अनुकुल व लाभदायक होईल. नंतरचा काळ प्रतिकुल असल्याने मनासारखे काहीही घडण्याची शक्यता दिसत नाही. मंगळ - गुरु शुभ योगामुळे वैद्यकीय व्यवसाय, औषध विक्रेते , यांत्रिक तांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. शक्यतो प्रवास टाळा. प्रवासात त्रास व मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. महिन्याचा उत्तरार्ध अनारोग्यकारक असून ताप, पोटाचे विकार, मूत्रमार्ग विकार अशापैकी आजार होणे संभवते. जपा. वाद, मतभेद, अनारोग्य अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येणे शक्य आहे. जपा. श्रद्धेने श्रीगुरू दत्तात्रेयाची उपासना करा.

=====00000=====